पालघर पोलीस स्टेशन जि.पालघर

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** पालघर **P.S.(ठाणे):** पालघर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0225 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 13/09/2023 20:15

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 25/08/2023

**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 08/09/2023

**Time From (वेळेपासून):** 11:21 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 14:02 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 13/09/2023 **Time (वेळ):** 20:02 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 024

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 13/09/2023 20:04 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** उप संचालक, औदयोगीक सुरक्षा, व आरोग्य संचलनालय,पालघर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

Scanned with CamScanner

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** उत्तम रघुनाथ बाबर

**(b) Guardian's Name (पालक चे नाव) :** रघुनाथ बाबर

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1965

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | चित्रालय बोईसर,पालघर,पालघर,पालघर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | चित्रालय बोईसर,पालघर,पालघर,पालघर,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9892181506

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नितीन आनंदराव गजपुरे | | पालक का नाम : आनंदराव गजपुरे | 1. उप संचालक, औदयोगीक सुरक्षा,व आरोग्य संचलनालय, पालघर ,पालघर ,पालघर, पालघर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 13/09/2023.

मी उत्तम रघुनाथ बाबर, वय 58 वर्ष व्यवसाय डॉक्टर, रा.चित्रालय बोईसर, ता.जि. पालघर, मोबाईल क्र. 9892181506 समक्ष हजर राहून फिर्याद लिहून देतो की,
मी एम.बी.बी.एस. व ए.एफ.आय.एच. चे शिक्षण पुर्ण केलेले आहे. तसेच सन 2005 पासून मी प्रमाणक शल्य चिकित्सक (Authorised Certifying Surgeon) म्हणून कार्यरत आहे. त्याकरीता आवश्यक असलेले प्रमाणक शल्य चिकीत्सक तथा उप संचालक, औदयोगीक सुरक्षा व आरोग्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिलेले प्रमाणक शल्य चिकीत्सक प्राधिकृती पत्र (Certificate) माझ्याकडे असून त्याची मुदत दिनांक 20/02/2023 ते दिनांक 19/02/2025 पर्यंत आहे. सदरचे प्राधिकृती पत्र हे दर दोन वर्षानी शासनाची फी भरून नुतनीकरण करणे आवश्यक असते.

शासनाच्या नियमाप्रमाणे प्रत्येक कारखानदाराला त्यांच्या कारखान्यातील प्रत्येक कामगारांची दरवर्षी प्रमाणक शल्य चिकीत्सक (Authorised Certifying Surgeon) यांचेकडून वैदयकीय तपासणी करून तसे प्रमाणपत्र घेणे आवश्यक असते. माझ्यासारखे इतर प्रमाणक शल्य चिकीत्सक (Authorised Certifying Surgeon) पालघर जिल्हयांत कार्यरत आहेत. मी पालघर जिल्हयातील प्रमाणक शल्य चिकीत्सक (Authorised Certifying Surgeon) असल्याने जिल्हयातील बोईसर, पालघर व वसई परीसरातील कारखान्यांमधील कामगारांची तपासणी करण्याचा अधिकार आहे. कंपनीतील कामगारांची तपासणी केल्यानंतर त्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधीत कंपनीकडे सादर करतो. तसेच केलेल्या वैद्यकीय तपासणीच्या अनुषंगाने संबधित कारखानदारांकडून माझी फी प्राप्त करून घेतो. अशा प्रकारे माझा व्यवसाय चालतो. प्रमाणक शल्य चिकीत्सक म्हणून माझा औदयोगीक सुरक्षा व आरोग्य संचलनालय, पालघर कार्यालयाशी तसा प्रत्यक्ष संबंध येत नाही.

काही वर्षापासून मी केलेल्या वैदयकीय तपासणीच्या अनुषंगाने संबंधीत कारखाना औदयोगीक सुरक्षा व आरोग्य संचलनालयाच्या ज्या उप संचालक यांच्या अखत्यारीत येतो त्यांनी आमचेकडून प्रत्येक कामगाराच्या तपासणी मागे 50/- रू प्रमाणे पैसे घेतलेले आहेत. जर मी ते पैसे देण्यास टाळाटाळ केली किंवा त्याकडे दुर्लक्ष केल्यास संबंधीत उप संचालक हे कारखानदारांना माझेकडून तपासणी करून घेवू नका असे सांगून माझे नुकसान करतात. त्यामुळे मी नाईलाजाने त्यांच्या मागणीप्रमाणे प्रत्येक कामगाराच्या तपासणी मागे 50/- रू देत आलो आहे. जुन 2023 मध्ये औदयोगीक सुरक्षा व आरोग्य संचलनालय, पालघर कार्यालयातील सह संचालक श्री.नरेश देवराज यांनी मला त्यांच्या कार्यालयात बोलावून मी वैदयकीय तपासणी केलेल्या प्रत्येक कामगारामागे त्यांच्या उप संचालकांना नेहमी देत असलेल्या 50/- रूपयापेक्षा वेगळे आणखी प्रत्येक कामगारामागे त्यांच्या स्वतःसाठी 100/- रू ची मागणी केली. परंतू अशा प्रकारे नेहमीच्या 50/- रूपयापेक्षा आणखी 100/- रू दिल्यास व्यवसाय करणे शक्य होणार नसल्याने मी त्यांच्या मागणीला कोणताच प्रतिसाद दिला नाही. परंतू त्यामुळे त्यांनी पालघर जिल्हयातील कारखानदारांना ''डॉ. बाबर हे पॅनेलवर नाहीत त्यांचेकडून कामगाराची वैदयकीय तपासणी करून घेवू नये'' अशा तोंडी सुचना दिल्याचे मला समजले. त्यामुळे काही कारखानदारांनी मला वैदयकीय तपासणीचे काम देणे बंद केले. त्यादरम्यान मला काही ओळखीच्या कारखानदारांनी ''साहेबांना भेटून काय ते फायनल करून घ्या.'' असे सांगीतले. त्यामुळे मला या सगळया गोष्टीचा खुप मनस्ताप झाला होता. तसेच औदयोगीक सुरक्षा व आरोग्य संचलनालय, पालघर कार्यालयाशी माझा कोणताही संबंध नसतानाही तेथील अधिकारी हे माझ्या व्यवसायात अडथळा निर्माण करीत होते. मी यापुर्वी पासून सदर अधिकारी यांना नाईलाजाने देत असलेले 50/- रू व आता सह संचालक मागणी करीत असलेले 100/- रू सुध्दा देण्याची इच्छा नसल्याने मी औदयोगीक सुरक्षा व आरोग्य संचलनालय, पालघर कार्यालयात जावून चौकशी केली असता, सह संचालक श्री.नरेश देवराज हे कार्यालयात हजर नसल्याने त्यांची भेट झाली नाही. परंतू उप संचालक नितीन गजपुरे हे कार्यालयात हजर असल्याने त्यांची भेट



Scanned with CamScanner

घेतली असता, त्यांनी मी विविध कंपन्यांमध्ये केलेल्या कामगारांच्या वैदयकीय तपासणीसाठी प्रत्येक कामगारामागे 50/- रूपये प्रमाणे लाचेची मागणी केली व सह संचालक श्री.नरेश देवराज यांचे मागणीबाबत तुम्ही त्यांना भेटून बोलणी करून घ्या असे सांगीतले.

तसेच मी नोव्हेंबर 2022 ते जून 2023 या कालावधीत केलेल्या एकुण कामगारांच्या तपासणीपैकी 630 कामगारांच्या वैदयकीय तपासणीचे पैसे मी नितीन गजपुरे यांना देणे बाकी असल्याचे त्यांचे म्हणणे होते.त्याप्रमाणे त्यांनी माझेकडे 630 कामगारांच्या वैदयकीय तपासणीचे प्रत्येक कामगारामागे 50/- रू याप्रमाणे 31,500/- रू लाचेची रूपये लाचेची मागणी केली होती. परंतू मला उप संचालक नितीन गजपुरे यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक 24/08/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयाचे पोलीस उप अधीक्षक श्री.गावडे यांचेशी फोनवरून संपर्क साधून माझी तक्रार सांगून दि. 25/08/2023 रोजी लेखी तक्रारीसह पालघर येथे भेटणार असल्याचे सांगीतले होते.

त्यानंतर दिनांक 25/08/2023 रोजी मी पोलीस उप अधीक्षक श्री.गावडे यांची पालघर येथे भेट घेवून माझी स्वहस्ताक्षरात लिहलेली तक्रार दोन पंचांसमक्ष दिली. मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचेच्या मागणीची पडताळणी करणेकामी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर चे पोलीस उप अधीक्षक श्री.गावडे यांनी बोलाविलेले दोन शासकीय पंच साक्षीदार यांचेशी माझी ओळख करून दिली. व मी दिलेल्या तक्रारीची हकीगत सांगून त्यांना मी लिहून दिलेली तक्रार वाचण्यास दिली. सदरची तक्रार वाचल्यानंतर दोन्ही पंचांनी त्यावर सहया केलेल्या आहेत. त्यानंतर दिनांक 25/08/2023 रोजी माझे अंगावर व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच नं. 1 श्री.राजेश आपटेकर यांचेसह उप संचालक नितीन गजपुरे यांची भेट घेण्यासाठी पाठवून लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, त्यामध्ये उप संचालक नितीन गजपुरे यांनी माझ्याकडे वैदयकीय तपासणी केलेल्या प्रत्येक कामगारामागे 50/- रू लाचेची मागणी केल्याचे तसेच वसई येथील काही कंपन्यांमध्ये केलेल्या कामगारांच्या वैदयकीय तपासणीचे पैसे माझेकडून स्विकारल्याचे देखील मान्य केल्याचे निष्पन्न झाले. तसेच उप संचालक नितीन गजपुरे यांनी त्यांच्या डायरीमध्ये मी विविध कंपन्यांमध्ये केलेल्या कामगारांच्या वैदयकीय तपासणीच्या नोंदी देखील ठेवल्याचे दाखवून त्याचा मला माझे मोबाईल मध्ये फोटो घेण्यास सांगीतला होता. त्याप्रमाणे मी सदर नोंदीचा फोटो मोबाईल मध्ये काढलेला होता. उप संचालक नितीन गजपुरे यांनी प्रत्येक कामगाराच्या तपासणीमागे 50/- रू याप्रमाणे लाचेची मागणी केली असल्याने मी माझे डायरीमध्ये विविध कंपन्यांमध्ये केलेल्या वैदयकीय तपासणींची नोंद केली होती. त्या नोंदींची पडताळणी उप संचालक नितीन गजपुरे यांनी त्यांच्या डायरीमध्ये केलेल्या नोंदींशी करून पाहीली असता, उप संचालक नितीन गजपुरे यांच्या म्हणण्याप्रमाणे 630 कामगारांच्या वैदयकीय तपासणीचे पैसे त्यांना देणे बाकी असून ते 50/- रू प्रमाणे 31,500/- रू इतके होत असल्याचे दिसून आले. व मी पडताळणी कारवाई दरम्यान उप संचालक नितीन गजपुरे यांना थोडया वेळात लाचेची रक्कम घेवून येतो असे सांगीतले असल्याने पोलीस उप अधीक्षक श्री.गावडे यांनी मी हजर केलेल्या 31,500/- रू रक्कमेवर लागलीच सापळापुर्व पंचनाम्याची कार्यवाही पुर्ण केली. त्यानंतर सदरच्या लाचेच्या रक्कमेसह माझे अंगावर व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच नं 1 यांचेसोबत उप संचालक नितीन गजपुरे यांचेकडे पाठवून लाचेचा सापळा आजमाविला. परंतू उप संचालक नितीन गजपुरे यांना संशय आल्याने त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम माझेकडून स्विकारली नाही. त्याबाबत पोलीस उप अधीक्षक श्री.गावडे यांनी दोन पंच साक्षीदारांच्या उपस्थितीत तसा सविस्तर पंचनामा केलेला आहे.

त्यानंतर दिनांक 28/08/2023 रोजी मी माझे कामानिमित्त औदयोगिक सुरक्षा व आरोग्य संचलनालय महाराष्ट्र राज्य, बांद्रा, मुंबई या कार्यालयात गेलो होतो. त्यावेळी तेथे उप संचालक नितीन गजपुरे यांची व माझी अनपेक्षीतपणे भेट झाली. त्यावेळी नितीन गजपुरे यांनी माझेशी थोडे बोलायचे आहे असे सांगीतले परंतू मी त्यावेळी कामात व्यस्त असल्याने सध्या माझेकडे वेळ नाही असे सांगून टाळले. त्यावेळी उप संचालक नितीन गजपुरे यांनी मला दिनांक 08/09/2023 रोजी माझे बोईसर येथील राहते घरी येवून भेटून बोलू असे सांगीतले होते. सदरबाबत मी पोलीस उप अधीक्षक श्री.गावडे यांना सांगीतल्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.गावडे यांनी उप संचालक नितीन गजपुरे यांच्या भेटी दरम्यान त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारण्याची शक्यता असल्याने माझे राहते घरी लाचेचा सापळा आजमाविण्याचा निर्णय घेतला.

त्याप्रमाणे दिनांक 08/09/2023 रोजी पोलीस उप अधीक्षक श्री.गावडे हे दोन पंच साक्षीदार व सापळा पथकासह माझे बोईसर येथील राहते घरी आले. त्यापुर्वी मी उप संचालक नितीन गजपुरे यांना फोन करून ते भेटण्यास येणार आहेत का? असे विचारले त्यावेळी त्यांनी येणार असल्याचे सांगीतल्याने मी त्यांना माझे राहते घराचा पत्ता पाठविला होता. त्यानंतर उप संचालक नितीन गजपुरे यांनी मागणी केलेली 31,500/- रू लाचेची रक्कम मी पोलीस उप अधीक्षक श्री.गावडे यांचेकडे हजर केल्यानंतर सदरच्या रक्कमेवर सापळापुर्व कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर थोडयाच वेळात उप संचालक नितीन गजपुरे हे माझे राहते घरी आले. त्यावेळी मी लाचेच्या रक्कमेसह

Scanned with CamScanner

उप संचालक नितीन गजपुरे यांना भेटलो. त्यावेळी उप संचालक नितीन गजपुरे यांनी मी त्यांची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयात केल्याचा संशय घेवून त्यांनी मला सदरच्या प्रकरणातून बाहेर काढण्यास मदत करण्याची विनंती केली. व यापुर्वी मागणी केलेल्या लाचेच्या रक्कमेबाबत बोलण्यास टाळाटाळ करून मला सदर प्रकरणात मध्यस्थी करण्यास सांगत होते. त्यामुळे माझी खात्री झाली की, मी त्यांचेविरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयाकडे दिलेल्या तक्रारीबाबत उप संचालक नितीन गजपुरे यांना संशय आला आहे. त्यामुळे त्यांनी माझेकडून मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारली नाही. तसेच यापुढेही ते मागणी केलेली लाचेची रक्कम माझेकडून स्विकारण्याची शक्यता नसल्यामुळे मी दिनांक 11/09/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर कार्यालयात सविस्तर जबाब दिलेला आहे.

तरी मी पालघर जिल्हयांतील प्रमाणक शल्य चिकित्सक असून माझेकडे महाराष्ट्र राज्य शासनाने दिलेली विहित प्रमाणपत्र (प्राधिकृती) असून देखील मी करित असलेला व्यवसाय चालू ठेवण्यासाठी लोकसेवक नितीन आनंदराव गजपुरे, उप संचालक, औदयोगीक सुरक्षा व आरोग्य संचलनालय, पालघर यांनी माझेकडे नोव्हेंबर 2022 ते जून 2023 या कालावधीत मी केलेल्या एकुण कामगारांच्या तपासणी पैकी 630 कामगारांच्या वैदयकीय तपासणीचे प्रत्येक कामगारामागे 50/- रू याप्रमाणे 31,500/- रू लाचेची मागणी केली म्हणुन माझी लोकसेवक नितीन गजपुरे, उप संचालक, औदयोगीक सुरक्षा व आरोग्य संचलनालय, पालघर यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा 1988 (सुधारणा 2018) चे कलम 7 प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

DATTATRAY BAJIRAO KINDRE(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

Scanned with CamScanner

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

KBabar

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

M Chavan
पोलीस ठाणे अंमलदार
पालघर पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** DATTATRAY BAJIRAC

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** PI



Scanned with CamScanner